कार्यालय :- आरोग्य विभाग, जिल्हा परिषद,वर्धा.

1 ला माळा , प्रशासकिय इमारत, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, सिव्हील लाईन,वर्धा-442001

दुरध्वनी क्रमांक 07152-243428 / Email ID dhowardha@rediffmail.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

पत्र क्र./जिपव/जिआअ/जाहिरात/ 2319 / /२०२६ दिनांक :-03 / ११/२०२६

अभिव्यक्ती व्याज सूचना (Expression of Interest - EOI Notice)
अभिव्यक्ती व्याज (EOI) नोटीस बोर्ड प्रसिद्धी पत्र

विषय: 'माझं गाव, आरोग्य संपन्न गाव' अभियानांतर्गत जिल्हास्तरीय स्वयंसेवी संस्थांकडून (NGOs) अभिव्यक्ती व्याज (EOI) मागविण्याबाबतची जाहिरात / सूचना मसुदा.

संदर्भ: १. शासन निर्णय क्र.: आंगायो-2025/प्र.क्र.24/ई-फिसक्र. 1245954/प्रा.आ.से., दि. 18/02/2026.
२. मा. आयुक्त (शहरी आरोग्य) आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, आयुक्तालय, मुंबई यांचे पत्र जा. क्र.:

आयुक्त/आसे/मागाआसंगा अभियान/जिल्हास्तर NGO-EOI/१४२५-१५०४/२०२६. दिः २२/०९/२०२६.
३. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. वर्धा यांची प्रशासकीय मान्यता आदेश दि. ०१/१०/२०२६.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार वर्धा जिल्ह्यातील ग्रामीण भागात 'माझं गाव, आरोग्य संपन्न गाव' हे अभियान लोकसहभागाच्या माध्यमातून प्रभावीपणे राबविण्याच्या दृष्टीने पात्र व अनुभवी स्वयंसेवी संस्थांकडून (NGOs) अभिव्यक्ती व्याज प्रस्ताव (Expression of Interest - EOI) मागविण्यात येत आहेत.

1. प्रस्तावाचा उद्देश (Objective):

ग्रामीण भागात संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजारांचे निर्मूलन, माता-बाल व प्रजनन आरोग्य, मानसिक आरोग्य आणि स्वच्छता याविषयी लोकसहभागातून (IEC & BCC माध्यम) प्रभावी जनजागृती करणे आणि स्थानिक आरोग्य समित्यांना सक्रिय करणे.

2. EOI/प्रस्तावामध्ये सादर करावयाची आवश्यक माहिती व कागदपत्रे:

संस्थेने आपल्या EOI प्रस्तावासोबत खालील मुद्यांनुसार माहिती व आवश्यक पुरावे जोडणे अनिवार्य आहे:

- **संस्थ्याची प्राथमिक माहिती :** संस्थेचे नाव व पूर्ण पत्ता, संस्था नोंदणी क्रमांक व नोंदणी दिनांक (संस्था नोंदणी अधिनियम, 1860 / मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, 1950 अंतर्गत वैध प्रमाणपत्र जोडणे), नीति आयोग (NITI Aayog - NGO Darpan) नोंदणी ID व प्रमाणपत्र.
- **अधिकृत संपर्क व्यक्तीचा तपशील :** अधिकृत प्रतिनिधीचे नाव व पदनाम, मोबाईल क्रमांक, व्हॉट्सॲप क्रमांक व अधिकृत ई-मेल आयडी.
- **आरोग्य क्षेत्रातील अनुभव :** केलेल्या कामाचा किमान 3 वर्षांचा अनुभव तपशील व कामाचे स्वरूप.

Scanned with OKEN Scanner

- **ग्रामीण व गावपातळीवरील कामाचा अनुभव :** वर्धा जिल्हा ग्रामीण भागात आरोग्य क्षेत्रातील / सामाजिक क्षेत्रातील गावपातळीवर लोकसहभागातून राबविलेल्या प्रकल्पांचा अनुभव.
- **IEC/BCC, जनजागृती व लोकसहभागाचा अनुभव :** पथनाट्य, लोककला, प्रभातफेरी, भिंतीचित्रे (Wall Paintings), ग्रामसभा व बचत गट बैठकांद्वारे जनजागृती केल्याचा प्रत्यक्ष अनुभव.
- **उपलब्ध प्रशिक्षित मनुष्यबळाची माहिती :** संस्थेकडे उपलब्ध असलेले फील्ड कॉर्डीनिटर्स, प्रशिक्षक व विषय तज्ञ मनुष्यबळाची यादी व त्यांची शैक्षणिक पात्रता.
- **मागील प्रकल्पांची माहिती व कामाचे पुरावे :** गेल्या 3 वर्षांत पूर्ण केलेल्या प्रकल्पांची यादी, कामाचे वाटप पत्र (Work Orders), प्रकल्प समाप्ती प्रमाणपत्रे (Completion Certificates) व कामाची प्रकाशचित्रे (Photographs), गेल्या 3 वर्षाचे ऑडिटेड स्टेटमेंट व IT Return.
- **Monitoring & Reporting (नियंत्रण व अहवाल) क्षमता :** मासिक प्रगती अहवाल (Monthly Progress Report), फोटो/व्हिडिओ पुरावे, बैठकांचे इतिवृत्त आणि डिजिटल पद्धतीने अहवाल सादर करण्याची संस्थेची तांत्रिक क्षमता व नियोजन.

3. निवडलेल्या NGO ची प्रत्यक्ष कामे व अंमलबजावणी पद्धती:

- **कामाचे स्वरूप :** गावातील आरोग्य गरजांचे आकलन करणे, ग्रामस्थांचा सहभाग वाढवणे, Gram Health, Sanitation & Nutrition Committee (VHNSC) व जन आरोग्य समित्यांशी समन्वय ठेवणे, महिला/बालके/वंचित घटकांचा सहभाग निश्चित करणे, तसेच मानसिक व संसर्गजन्य/असंसर्गजन्य आजारांबाबत जनजागृती करणे.
- **Bottom-up पद्धती :** गावातील समस्या → ग्रामस्थांचा सहभाग → स्थानिक उपाययोजना → आरोग्य विभागाचे सहकार्य. केवळ Top-down सूचनांऐवजी प्रत्यक्ष स्थानिक गरजा व समुदायाला केंद्रस्थानी ठेवून जनजागृती उपक्रम राबविणे.

4. प्रस्ताव सादरीकरणाची पद्धत व वेळापत्रक:

क्र.	टप्पा / बाबी	निश्चित केलेली तारीख / वेळ
1	EOI नोटीस बोर्ड प्रसिद्धी दिनांक	०४ नोव्हेंबर 2026
2	प्रस्ताव (EOI) सादर करण्याचा अंतिम दिनांक	१६ नोव्हेंबर 2026 (सायंकाळी 5:00 वाजेपर्यंत)
3	प्रस्तावांची तांत्रिक छाननी (Technical Scrutiny)	१९ नोव्हेंबर 2026
4	पात्र संस्थांचे सादरीकरण (Presentation)	२६ नोव्हेंबर 2026

5. देयके व मूल्यमापन अटी:

संस्थांना कामाच्या प्रगतीचा भौतिक व आर्थिक अहवाल (Physical & Financial Progress Report) सादर केल्यानंतर मान्य दराप्रमाणे टप्प्याटप्याने (Phase-wise) देयके अदा केली जातील, सर्व खरेदी, छपाई व प्रसिद्धी साहित्य (IEC Material) शासनाच्या प्रचलित नियमावलीनुसार असणे अनिवार्य आहे.

Scanned with OKEN Scanner

6. नियम व अटी:

1. संस्था कोणत्याही शासकीय यंत्रणेकडून काळ्या यादीत (Blacklisted) नसलेले रु. 100/- च्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र (Affidavit) जोडणे अनिवार्य आहे.

2. विहित मुदतीनंतर (16/11/2026 सायंकाळी 5:00 वाजेनंतर) प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांचा विचार केला जाणार नाही.

3. प्राप्त प्रस्ताव स्वीकारणे अथवा नाकारण्याचे सर्व अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहेत.

प्रस्ताव सादर करण्याचा पत्ता:
सीलबंद लिफाफ्यावर स्पष्ट लिहावे: "'माझं गाव, आरोग्य संपन्न गाव' अभियानांतर्गत EOI प्रस्ताव"
कार्यालयीन पत्ता: जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, वर्धा

प्रत माहिती व आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर :

१. मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा

२. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा

३. मा. उपसंचालक, आरोग्य सेवा, नागपूर मंडळ, नागपूर

४. मा. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत), जिल्हा परिषद, वर्धा.

जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, वर्धा

Scanned with OKEN Scanner